**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ८**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १०/०२/२०१०

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ८ सोमवार दि. १५/०२/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये — अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक- १५/०२ /२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| **१०६** | **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव**<br>**(१)** मा. शासनाचे मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ७०४/अस दि.२३सप्टेंबर २००९अन्वये परिपत्रकानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १२९(क) च्या ६३अन्वये अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात सन २०१०-११या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्यावर (कमीत कमी १/८ किंवा जास्तीत जास्त २%)अग्निशमन कर लागु करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| | **(२)** मा. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र उदयोग उर्जा व कामगार विभाग बीसीए१२००७/प्र.क्र.७८८/ कामगार ७ दि.२१ एप्रिल २००८अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर अधिनियम १९९६ या बाबतचे उपकर नियम १९९८अंतर्गत (बांधकाम ठेकेदाराकडून बांधकामाच्या मुल्यावर १%)उपकर वसुलीबाबत कार्यवाही करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| | **(३)** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुती,बाहयरूग्ण विभाग इत्यादी विभागातील कामाचा अनुभव मिळण्यासाठी व प्रशिक्षणासाठी प्रयत्न फौन्डेशन यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन/प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यींसाठी प्रति दिन दोन खाटासाठी रूपये २०/- प्रमाणे शुल्क आकारून अटी शर्तीवर परवानगी देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

...२

| | |
|---|---|
| | **(४)**अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्हयातील व शहरातील नर्सिंग इन्स्टिटयुटचे विद्यार्थ्यी कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी /प्रति दिन/ प्रति खाट रूपये १०/-प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यीसाठी प्रति दिन दोन खाटासाठी रू.२०/- प्रमाणे संस्थाकडून शुल्क आकारणी करून परवानगी देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| | **(५)**अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने,रूग्णालये व फिरता दवाखाना येथे पुरविल्या जाणा-या आरोग्य विषयक वैद्यकिय सेवा सुविधाचे सेवा शुल्कात दर वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| | **(६)** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ अंतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना २००९ अन्वये अग्निशमन सेवा फी बसविणे आणि फी मध्यें वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| | **(७)** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६,१(अ) व ३८६(१) अन्वये शहरातील व्यापारी संकुल, हॉटेल्स, इमारती, सिनेमागृह, पेट्रोलपंप, हॉस्पीटल, लॉजेस इत्यादी साठी अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय-क्रमांक १०६ (१ ते ७ ) च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/१ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक - १०६/१ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(१)** मा.शासनाचे मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.७०४/अस दि.२३सप्टेंबर २००९अन्वये परिपत्रकानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १२९(क)च्या ६३अन्वये अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात सन २०१०-११या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्यावर (कमीत कमी १/८ किंवा जास्तीत जास्त २%) अग्निशमन कर लागु करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अग्निशमन विभाग जा.क्र. ४४८ दि.६/०१/२०१०

सादर,

विषय :- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामधे अग्निशमन कर लागू करणे बाबत.

संदर्भ :- संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ७०४ / अस दि. २३ सप्टेंबर २००९

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो की, आजमितीस महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्येअग्निशमन दलामार्फत आपतकालीन प्रसंगी सेवा पुरविली जाते. पंरतु इतर महानगरपालिकाप्रमाणे अग्निशमन कर अकारणी केली जात नाही.

सदंर्भिय शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसरंक्षण उपाययोजना अधिनियम २००६ दि. ६ डिसेंबर २००८ पासून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केला आहे. या अधिनियमाचे कलम ४ अन्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ शासनाने दि.२३ जून २००९ रोजी मंजूर करून शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. सदर अधिनियम व नियमावर कार्यवाही होणेकरिता सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त अधिनियम २००६ चे कलम २५(३) नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी शासन निर्णयानुसार नगरविकास विभाग क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र. २११ / नवि-२० दि.३१/०८/२००९ नुसार अग्निशमन सेवेतील तूट भरून काढणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुदीनुसार "आग सुरक्षा निधी" त्याचबरोबर मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १२९ चे (क) च्या ६३ नुसार "अग्निशमन कर" अकारणे बंधनकारक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे ज्या अग्निशमन सेवा अशा प्रकारचा कर अकारत नाहीत त्यांनी तो तात्काळ चालू करणे आवश्यक आहे. असे संदर्भिय शासकीय परिपत्रकान्वये निर्देश देणेत आलेले असल्याने अ.नगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रत्येक करयोग्य मुल्यांचे ५ % अग्निशमन कर सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून लागू करणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य अग्निशामक अधिकारी यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक :- अग्निशामक कर ५% दराने लागू करणेबाबत स्थायी समितीसमोर विषय ठेवणेत यावा. दि.१७/१२/०९

मुख्य लेखाअधिकारी :-मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १२९(क)नुसार कर योग्य मुल्यांच्या कमीत कमी १/८किंवा जास्तीत जास्त २%मुल्य सामान्य करात समाविष्ट करण्याची तरतूदआहे.याबाबत निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणे योग्य.दि.१८/१२/०९ **/अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार मान्यतेस्तव सादर. दि. २१/१२/०९

मा. आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २१/१२/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्येे वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्येे झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाचे परिपत्रकानुसार महानगरपालिका क्षेत्रात सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून कमीत कमी १/८ किंवा जास्तीत जास्त २% अग्निशमन कर लागु करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- कार्यालयीन प्रस्ताव वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे मुख्य अग्निशामक अधिकरी श्री.मिसाळ यांनी कार्यालयीन प्रस्ताव सभेमध्ये वाचून दाखविला.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- प्रत्येक करयोग्य मुल्यावर कर आकारणे बाबतचा प्रस्ताव आहे. तो मा. शासन परिपत्रकानुसार सभेपुढे सादर केलेला आहे. परंतु सदर सभेचे अजेंडया सोबतचे प्रस्तावाचे टिप्पणी बरोबर मा. शासनाचे परिपत्रकाची प्रत मा.सदस्यांना दिलेली नाही.

मा.सभापती साहेब :-मा.शासनाचे परिपत्रक वाचून दाखवावे.

त्याप्रमाणे मुख्य अग्निशामक अधिकारी यांनी मा. महाराष्ट्र शासन क्र.७०४/अस/महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार फायर प्रोटेक्शन फंड चालू करणे बाबतचे दि.२३ सप्टेंबर २००९ चे परिपत्रक सभेमध्ये वाचून दाखविले.

मा.सौ.ढोणे मा.सु.:- परिपत्रक मा.सदस्यांना पाठविलेले नाही कर दर वाढ केल्यास नागरिक कर वाढले म्हणून ना पसंती व्यक्त करतील अधिनियम २००६ मधील आहे तो उशिरा मा.सभेपुढे सादर केलेला आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा.शासनाने कायदयामध्ये दुरूस्ती करून अग्निशमन सेवा सक्षम व्हावी या करिता अग्निशमन कर लागु करणे बंधन कारक केलेले आहे. मा. शासनाचे दिनांक २३ सप्टेंबर २००९ चे परिपत्रक आहे त्यानुसार प्रस्ताव सभे पुढे सादर केलेला आहे. कर दर वाढीचे प्रस्ताव याच वेळेस सादर करण्यांत येतात त्याप्रमाणे प्रस्ताव मा. सभेपुढे सादर केलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- नागरिकांना सोई सुविधा पुरविणेचे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे कर वाढविले तर नागरिक तक्रार करतील.

मा.श्री.पवार बा. रे. :-प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर केला आहे.असे कार्यालयीन प्रस्तावामध्ये उल्लेखिलेले आहे.

मा.उपायुक्त(सा.)श्री. हांगे साहेबः-मा.स्थायी समितीचे मंजूरीने, शिफारसीनुसार सदर प्रस्ताव मा. महासभे पुढे मंजूरी साठी सादर करणेत यावा.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- कर दर वाढविले तर नागरिक तक्रार करतील नागरिकांना सेवा सुविधा पुरविणेचे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. नागरिक कर भरतात त्यांना ही काही सवलती देणे आवश्यक आहे. त्या करिता मी भारतीय जनता पार्टी व शिवसेने च्या वतीने सुचना मांडतो की जो नागरिक सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे पहिले तीन महिन्यामध्ये महानगरपालिकेचे सर्व कर भरील त्या नागरिकांना करामध्ये १०% सुट देण्यात यावी.

मा.श्री.पवार बा.रे.:- अग्निशमन कर दोन टक्के प्रमाणे लागु करणेस मंजूरी देण्यास शिफारस करण्यांत यावी. तसेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे पहिले तीन महिन्यामध्ये महानगरपालिकेचे सर्व पाणीपट्टी व मालमत्ता कर भरील अशा मालमत्ता धारकास करामध्ये १०% सुट देण्यांबाबत शिफारस करण्यात यावी. अखेर मंजूरीसाठी मा.महासभे पुढे प्रस्ताव सादर करावा.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-प्रत्येक करयोग्य मुल्यावर २%अग्निशमन करलागु करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत यावी.तसेच सन २०१०-११या आर्थिक वर्षाचे पहिले तीन महिन्यामध्ये महानगरपालिकेचे सर्व पाणीपट्टी व मालमत्ता कर भरील अशा मालमत्ता धारकास करामध्ये १०% सुट देण्यांबाबत शिफारस करण्यात यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा.महासभे पुढे सादर करावा.

मा.सभापती साहेब :-ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते दोन टक्के अग्निशमन कर लागु करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत यावी. तसेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे पहिले तीन महिन्यामध्ये महानगरपालिकेचे सर्व पाणीपट्टी व मालमत्ता कर भरील अशा मालमत्ता धारकास करामध्ये १०%सुट देण्यांबाबत शिफारस करण्यात यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा.महासभे कडेस सादर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** मा.शासनाचे मा.संचालक,महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचेपत्रक्र.७०४/अस.दि.२३सप्टेंबर२००९अन्वयेचे परिपत्रकानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १२९(क)अन्वये अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात सन-२०१०-११ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्यावर २%(दोन टक्के फक्त)अग्निशमन कर लागु करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच सन-२०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे पहिले तीन महिन्यामध्ये महानगरपालिकेचे सर्व पाणीपट्टी व मालमत्ता कर भरील अशा मालमत्ता धारकास करामध्यें १०% (दहा टक्के फक्त) सुट देण्यास शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/२ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक - १०६/२ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(२)** मा.महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र उदयोग उर्जा व कामगार विभाग बीसीए १२००७ /प्र.क्र.७८८ / कामगार ७ दि.२१ एप्रिल २००८ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर अधिनियम १९९६ या बाबतचे उपकर नियम १९९८ अंतर्गत (बांधकाम ठेकेदाराकडून बांधकामाच्या मुल्यावर १%) उपकर वसुलीबाबत कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर मनपा सावेडी उपविभाग जा.क्र. ६१२ दि.१६/०१/२०१०

विषय :- इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ व त्या अंतर्गत नियम १९९८ अन्वये उपकर वसुलीबाबत.

सादर,

कार्यालयीन आदेश क्र. आस्था. २६७० दि.१६/११/०९ अन्वये उपरोक्त विषयांकित उपकर वसुलीसाठी अधिकारी म्हणून श्री.आर.ए.देशमुख्य , सहाय्यक आयुक्त तसेच निर्धारण अधिकारी (मा.उपायुक्तसाहेब कर) तसेच अपिलीय अधिकारी (मा.आयुक्तसाहेब) यांचा नियुक्ती करण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कडील परिपत्रक क्र. उदयोग उर्जा व कामगार विभाग बीसीए १२००७/ प्र.क्र. ७८८/कामगार ७ दि.२१ एप्रिल २००८ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर अधिनियम १९९६ याबाबतचे उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकर वसुलीबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहे.

इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर नियम १९९८ बाबत महा. शासनाने (उदयोग व कामगार विभाग) बीसीए/२००८/प्र.क्र. ९०७/ कामगार-७ दि. १६ एप्रिल ०८ अन्वये अधिसुचना जाहीर करून त्या आस्थापनासाठी वसुली अधिकारी नियंत्रण अधिकारी (राजपत्रित अधिकारी) व अपिलिय अधिकारी यांचे नियुक्ती करणेबाबत अधिसुचना जाहिर केलेली आहे. दि. २१ एप्रिल २००८ च्या परिपत्रकान्वये १ जानेवारी २००८ पासून पुर्वलक्षीप्रभावाने राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियुक्त्याकडून १% उपकर बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार (जमिनीचे मुल्य वगळून ) वसुल करणेबाबत तरतुद केलेली आहे. सदरचे वसुल केलेली रक्कम इमारत व इतर बांधकाम महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळास पाठविणेबाबत तरतूद आहे. सदरचा निधी महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ खाते क्र.००४२२०११०००००१५३ बँक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा मुंबई-३४ या राष्ट्रीयकृत बॅकेत जमा करणेबाबत सुचीत केलेले आहे. सदरची रक्कम जमा झाल्यापासून ३० दिवसापासून आत भरणे आवश्यक आहे.

सदर कायदयाच्या तरतुदी १ जानेवारी २००८ पासून लागू झालेला असून त्यामध्ये व्याख्येमध्ये कायदयाचे कलम २ चे (डी) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरच्या कायदयाच्या तरतुदी महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार यांच्यामार्फत केल्या जाणा-या इमारतीचे बांधकाम दुरूस्ती, किंवा इमारत पाडणे यास लागु होतो. त्यामध्ये शासनाच्या इमारती रस्ते, रेल्वे, ट्रॉमवे विमानतळाच्या धावपट्टया , ऐरिगेशन, ड्रेनेज, पुर प्रतिबंधक कामे, इलेक्ट्रीक तयार करणे व सप्लाय करणे., पाणी पुरवठयाची कामे, त्यामध्ये (कॅनालसहीत) खनिज तेले, इलेक्ट्रीक लाईन्स, वायरलेस, रेडिओ, टेलिव्हिजन टेलिफोन, टेलिग्राफ, आंतरराष्ट्रीय दळणवळण, तलाव, पुल इ. कामाचा समावेश होतो. मात्र सदर कायदयाच्या तरतुदी फॅक्टरी ॲक्ट १९४८ व मरीन ॲक्ट १९५२ यांना लागू होणार नाही अशी तरतुद आहे.

कलम २ (J) यामध्ये "आस्थापना" ("ॲस्टॅबलिशमेंट") याची व्याख्या देण्यात आलेली असुन त्यामध्ये शासनाच्या अखत्यारीतील चालणारी कामे व त्यासाठी असलेली स्वायत्त मंडळ किंवा फर्म तसेच बांधकामासाठी ज्याच्या मार्फत कामगार नेमले जातात. असे ठेकेदार यांचा समावेश होतो. मात्र यामध्ये वैयक्तीक स्वरूपाचे स्वतच्या राहण्यासाठी केल्या जाणा-या बांधकामाचा समावेश होत नाही. बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३ अन्वये किमान १% व कमाल २% उपकर लावणेबाबत तरतुद आहे. तसेच पोटकलम (२) अन्वये सदरचा उपकर हा स्थानिक स्वराज्य संस्थेने बांधकाम परवानगी देतानाच वसुल करणेबाबत तरतुद आहे. व पोटकलम (३) अन्वये तो शासनाकडे त्वरीत भरणेबाबत तरतुद आहे. सदरचा उपकर १% प्रमाणे वसुल करणेबाबत १ एप्रिल २००९ च्या परिपत्रकान्वये कळविलेले आहे.

**सन- १९९८ च्या नियमामधील तरतुदीप्रमाणे कलम ४ व ५,६ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.**

**४)** १. ४(१) पोट नियम १ सेक्शन ३ नुसार उपकर, मालकाने बांधकाम पूर्ण झाल्यापासून ३० दिवसात किंवा कर आकारणी पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसात यापैकी जे अगोदर ते कर गोळा करणा-या व्यक्तीस दयावी.

२. ४(२) पोट नियम १ नुसार प्रकल्प उभारणीचा कालावधी एक वर्षापेक्षा जास्त असेल तर उपकर हा काम सुरू झाल्यापासून तीस दिवसात भरावा व त्यानंतर प्रत्येक वर्षी सरकारने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे बांधकामाच्या झालेल्या खर्चाच्या प्रमाणात भरावे.

३. पोट नियम १ व २ शिवाय जेथे ठेकेदार सार्वजनिक बांधकाम व इमारत बांधत असतील तर त्यांच्या बिलातुन वेळोवेळी जाहिर केलेल्या दराप्रमाणे उपकराची कपात करण्यात येईल. अगर ठेकेदाराला त्याची माहिती देण्यात येईल.

४. पोट नियम १ व २ शिवाय ज्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थाची मंजुरी असेल अशा प्रत्येक मंजुरी प्रकरणामध्ये स्थानिक संस्थांनी कामगार कल्याण मंडळाला उपकराचा भरणा धनादेशाने करावा. ही रक्कम बांधकामाच्या खर्चाच्या प्रमाणात असावी.

५. ज्या वेळेस अशा प्रकल्पांचा कालावधी एक वर्षापेक्षा जास्त असेल त्यावेळेस उपकराची रक्कम प्रकल्पाचे बांधकाम सुरू झालेल्या तारखेपासून आाकारणी करून भरावी. तसेच पुढील होणा-या पेमेंटप्रमाणे उपकराची आकारणी करावी. मालक अशा उपकराची रक्कम आगाउ भरू शकतात. त्यावेळेस बांधकामाचे अंदाजपत्रक व काम सुरू झाल्याची नोटीसीची प्रत ड्राप्ट सोबत असावी.

६. जर प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण होण्यास एक वर्षापेक्षा जास्त वेळ लागणार असेल, जर मालक उपकराची रक्कम मागील वर्षाच्या प्रमाणात भरू शकेल उपकराची आगाउ भरलेली रक्कम ठेकेदारांच्या बिलातुन समायोजीत केली जाईल.

**५) अशी उपकराची जमा झालेली रक्कम**

१. राज्य सरकार, सार्वजनिक प्रकल्पांच्या संस्था, स्थानिक बांधकाम संस्था, अगर कर गोळा करणारी संस्था कामगार कल्याण मंडळाकडे लेखांच्या नियमाप्रमाणे विहित नमुन्यात जमा करण्यात येईल.

२. सरकारी कार्यालये प्रकल्प संस्था अशा उपकराची रक्कम जर मंडळाकडे उपकराची रक्कम जास्त गेली असेल तर प्रकल्पांच्या बांधकामावर झालेल्या खर्चाच्या प्रमाणात आकारणी करून जादा रक्कमेची वजावट करून शकतात.

३. अशा प्रकारे जमा केलेली रक्कम ही कामगार कल्याण मंडळाकडे जमा झालेल्या दिवसापासून ३० दिवसात भरावी.

**६)** **मालकाने दयावयाची माहिती.**

१. प्रत्येक मालकाने काम सुरू झालेल्या तारखेपासून जमा केलेल्या उपकराची माहिती तीस दिवसात नमुना क्र.१ मध्ये दयावी.

२. जर काही प्रकल्पात अगर उपकरांच्या रक्कमेत बदल झाल्यास त्याची माहिती अधिका-यास बदलाच्या तारखेपासून तीस दिवसात दयावी.

तसेच सदरबाबत महाराष्ट्र शासनाने त्यांच्याकडील नोटीफिकेशन क्र.उदयोग उर्जा व कामगार विभाग क्र.बीसीए/३२००३/सी.आर.१४६/लेबर-६ दि.५ फेब्रुवारी २००७ अन्वये MAHARASHTRA BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) RULES २००७केलेले असून त्याची अंमलबजावणी करणेबाबत तरतुद आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकर वसुल करण्याबाबतची कार्यपध्दतीबाबत महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र.बीसीए २००७/प्र.क्र. ७८८/ कामगार ७-अ दि.२६ ऑक्टोंबर २००९ चे परिपत्रकात नमुद केलेले मुद्दा अ मध्ये

अ) उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या अधिसुचना क्र.बीसीए २००८/प्र.क्र. ९०७/का-७ दिनांक १६ एप्रिल २००८ च्या रकाना क्रमांक २ मध्ये दर्शविलेल्या आस्थापना जसे शासकीय व इतर बांधकाम करणा-या आस्थापना, सार्वजनिक उपक्रमाच्या इमारत व इतर बांधकामाशी संबंधीत असलेल्या आस्थापना तसेच महानगरपालिका, नगरपपरिषदा, ग्रामपंचायती इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच या व्यतिरिक्त असलेल्या इतर कोणत्याही बांधकाम करणा-या आस्थापना यांनी त्याच्याशी संबंधीत " नोंदणी अधिकारी" यांच्याकडे इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवशर्ती नियमन) अधिनियम १९९६ च्या कलम ७ नुसार नोंदणी करावी. नियोक्त्याने अशी नोंदणी न केल्यास त्याला इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवशर्ती नियमन) अधिनियम १९९६ च्या कलम १० नुसार कामगार नियुक्ती करता येणार नाही अशी तरतुद आहे. तसेच या अधिनियमाच्या कलम ५० नुसार या अधिनियमातील तरतुदीचा भंग केल्यास रू.१०००/- इतका दंड आणि तरतुदीचे पालन करेपर्यत प्रत्येक दिवसाकरिता रू.१००/- इतक्या दंडाची तरतुद आहे. तसेच बांधकामासंबंधी कलम ४६ नुसारची सुचना मालकाने न दिल्यास ३ महिन्यापर्यत कैद आणि किंवा रू. २०००/- पर्यत दंड अशी तरतुद कलम ४८ मध्ये आहे. सर्व संबधीत विभागांनी, सर्व संबंधीताविरूध्द योग्य ती दंडनीय कार्यवाही करून अधिनियमातील तरतुदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

वरील सर्व बाबी पाहता ज्या इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र शासन केंद्र सरकार यांच्यासाठी बांधकामाची जी कामे केली जाणार आहेत अशा ठेकेदाराकडून संपूर्ण बांधकामाच्या रकमेवर १% उपकर वसुल करणे बाबत व दि.२१ एप्रिल २००८ च्या महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार उदयोग उर्जा व कामगार विभागाच्या परिपत्रकान्वये वसुल करणे बाबत कळविलेले आहे. सदरचा उपकर फक्त २ (J) मधील आस्थापनांना लागु होतो. २(J) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

(J)"Establishment" means any establishment belonging to or under the control of government, any body corporate or firm, an individual or, association or other body of individuals which or who employs building workers in any building or other construction work ; and Includs as establishent belonging to a contractor, but does not include an individual who employs such workers in any building or contruction work , in relation to his own residence the total cost of such construction not being more than rupees ten lokhs;

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियम अधिनियम १९९६) तसेच याबाबतचा उपकर अधिनियम १९९६ व कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९८ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार कायदयाचे कलम २ (डी) मध्ये नमुद केलेल्या बांधकामाचे कामगार , तसेच २(J)आस्थापना (एसटॅबलिशमेंट) यामध्ये नमुद केलेल्या बांधकाम ठेकेदाराकडून, बांधकामाच्या मुल्यावर १% उपकर वसुल करणे आवश्यक आहे. मात्र सदरचा उपकर हा वैयक्तीक रित्या केल्या जाणा-या बांधकामाला लागु नाही. त्यामुळे सदरचा उपकर कायदयातील तरतुदीप्रमाणे वसुल करण्यासाठी बांधकामासाठी परवानगी मागतणेबाबतचे अर्ज नगररचना विभागाकडून स्विकारतांना संबंधीताकडून बांधकामाच्या मुल्याबाबत व खर्चाचे अंदाजपत्रक मागवून घेवुन बांधकामाची मंजुरी देते वेळीच उपकर वसुल करणे योग्य होईल.

सदरचा उपकर हा कायदयातील तरतुदीप्रमाणे १ जानेवारी २००८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागु झालेला असल्याने दि. १ जानेवारी २००८ नंतर अशा स्वरूपाच्या दिलेल्या बांधकाम परवान्याचा विचार करून संबंधीतांकडून बांधकामाचे अंदाजपत्रक मागवुन घेवुन १% उपकर वसुल करावा लागेल. सबब आदेशार्थ सादर**./अ**

येणे प्रमाणे श्री. आर.ए.देशमुख , सहा. आयुक्त यांचा अहवाल असे. दि.२२/१२/०९

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- CAFO दि. २४/१२/०९

मुख्य लेखा अधिकारी :- सादर, ठेकेदाराकडून संपूर्ण बांधकामाच्या रकमेवर १% उपकर वसुलीची कार्यवाही पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दि. १ जान २००८ पासून लागू करणेस हरकत नाही. सदरची उपकर वसुलीच कार्यवाही नगररचनाकार यांचेमार्फत होणे आवश्यक मान्यतेस्तव तथा आदेशार्थ. दि. २४/१२/०९ **/अ**

मा. उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव सादर. दि.१४/०१/१०/**अ**

मा.आयुक्त साहेब :- सदर प्रकरणी वसुली अधिकारी म्हणून श्री. संतोष धोंगडे नगर रचनाकार यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येते पुढील आवश्यक कार्यवाही आदेशानुसार त्यांनी करावी. दि. १६/०१/०१

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाचे परिपत्रकानुसार इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर अधिनियम १९९६ उपकर अधिनियम १९९८ अंतर्गत बांधकाम ठेकेदाराकडून बांधकामाच्या मुल्यावर १% उपकर वसुली बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- मा. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक उदयोग उर्जा व कामगार विभाग बीसीए १२००७/प्र.क्र. ७८८/कामगार ७ दि.२१ एप्रिल २००८ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर अधिनियम १९९६ याबाबतचे उपकर नियम १९९८ अंतर्गत बांधकाम ठेकेदाराकडून बांधकामाचे मुल्यावर १% उपकर वसुलीबाबत कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सभे पुढे सादर केलेला आहे. या उपकराचा भार सामान्य नागरिकांवर पडणार नसून शासनामार्फत, बांधकाम विभाग इत्यादी विभागामार्फत ठेकेदाराकडून केल्या जाणा-या बांधकामावर सदरचा १% उपकर कर आकारणी केली जाईल. हा उपकर सर्वसामान्याकडून वसुल केला जाणार नाही.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- हा कर मा. शासनाकडेस जमा होणार आहे का ?

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- आपण कर वसुल करून तो मा.शासनाकडेस पाठविणे आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- आपण मध्यस्त म्हणून कर वसुल करून शासनाकडेस जमा करणार आहोत.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- आपण प्रस्ताव फेटाळला तरी मा. शासन निर्णय प्रमाणे तो वसुल करावाच लागेल.

मा.श्री. कांबळे र.द.:- प्रस्ताव मंजूर करणेस शिफारस करण्यांत यावी. अखेर मंजूरीसाठी मा. महासभेपुढे सादर करावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- प्रस्ताव मंजूर करणेस शिफारस करण्यांत यावी. अखेर मंजूरीसाठी मा.महासभे पुढे सादर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.अखेर मंजूरीसाठी मा. महासभेपुढे सादर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** मा.महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र उदयोग उर्जा व कामगार विभाग बीसीए १२००७ /प्र.क्र.७८८ / कामगार ७ दि.२१ एप्रिल २००८ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर अधिनियम १९९६ या बाबतचे उपकर नियम १९९८ अंतर्गत बांधकाम ठेकेदाराकडून बांधकामाच्या मुल्यावर १%(एक टक्का फक्त) उपकर वसुलीबाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यास शिफारस करण्यांत येत आहे.अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/३ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक- १०६/३ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(३)**अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुती,बाहयरूग्ण विभाग इत्यादी विभागातील कामाचा अनुभव मिळण्यासाठी व प्रशिक्षणासाठी प्रयत्न फौन्डेशन यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन/प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रति दिन दोन खाटासाठी रूपये २०/- प्रमाणे शुल्क आकारून अटी शर्तीवर परवानगी देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह, मनपा अ.नगर जा.क्र. ८८४ दिनांक १६/०१/१० सादर, विषय- ANM प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी कै.बा.दे. दवाखान्यात परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) जा.क्र. ०९/१२/०४/०९ प्रयत्न फौंडेशन, अहमदनगर दिनांक १७/१२/०९ चा अर्ज.

२) शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००९ सीआ-१२३/०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन , मुंबई-३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, प्रयत्न फौंडेशन, अहमदनगर यांनी त्यांच्या संस्थेतील ANM प्रशिक्षणार्थीना प्रसुती, स्त्री रोगाबाबत बाह्यरूग्ण विभागातील व रूग्णालयातील कामाचा अनुभव मिळण्यासाठी आपल्या कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे परवानगी मिळणे बाबत अर्ज केला आहे.

सर्व प्रशिक्षणार्थी प्रसुतिपूर्व कक्ष, प्रसुति पश्चात कक्ष, बाह्य रूग्ण विभाग, शस्त्रक्रियागार विभाग व प्रसुति कक्ष या विभागात प्रत्यक्ष अनुभव घेतील व त्यांच्या समवेत सिस्टर टयुटर त्यांना प्रसुती कार्यानुभव शिकवतील

सदर संस्थेस मान्यता देणेसाठी शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००९ सीआ-१२३/०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय , महाराष्ट्र शासन, मुंबई- ३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९ अन्वये रूग्णालयीन चिकित्सालयीन सुविधा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापरण्यास प्रती विद्यार्थी / प्रती दिन / प्रती खाटेसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. सदर शुल्क अभ्यासक्रमासाठी मंजुर विद्यार्थी प्रवेश क्षमतेनुसार आकारण्यात येईल.

| अ.क्र. | अभ्यासक्रम नांव | शुल्क |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रम | रूपये २५/- |
| २ | भौतिकोपचार, व्यवसायोपचार यासारखे निमवैद्यकीय अभ्यासक्रम | रूपये १५/- |
| ३ | परिचार्या विषयक पदवी / पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम | रूपये १०/- |

तरी सदर संस्थेस सन २००९-१० साठी नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थीनीना प्रात्येक्षिक अनुभवासाठी / प्रशिक्षणाची शासन निर्णयानुसार प्रति दिन / प्रति विद्यार्थी / प्रति खाटासाठी रू. १०/- या प्रमाणे खालील अटी व शर्तीवर परवानगी देणे उचित वाटते.

**अटी व शर्ती-**

१) कै.बा.दे. दवाखाना येथे प्रामुख्याने प्रसुती होतात. येथे १०० खाटांची सोय असुन दरमहा अंदाजे सरासरी ३०० पर्यत बाळांतपणे होतात. त्यासाठी प्रशिक्षणार्थीना गट करून पाठविणे आवश्यक आहे.

२) प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकाची (टयुटर) व्यवस्था संबंधीत संस्थेने केली पाहिजे. प्रशिक्षणार्थीवर नियंत्रण ठेवणे ही टयुटरची जबाबदारी राहील. टयुटरने प्रत्येक प्रशिक्षणाच्या वेळी हजर असणे आवश्यक आहे.

३) प्रशिक्षण कालावधीत त्यांचे डयुटी संबंधी इन्चार्ज स्त्री वैद्यकीय अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या संमतीने व सुचनेप्रमाणे संबंधीत संस्थेस व्यवस्था करावी लागेल.

४) प्रशिक्षणासाठी परवानगी दिल्यानंतर प्रत्यक्षात प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी विहित नमुन्यात करारपत्र सदर संस्थेच्या वतीने जबाबदार पदाधिका-यांनी स्वाक्षंकित करून द्यावे लागेल. तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक ती मान्यता इंडियन नर्सिंग कौंसिलच्या सक्षम अधिका-याकडून घेणाची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

५) सदरची परवानगी तात्पुरत्या स्वरूपाची असुन जास्तीत जास्त ५ वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येईल. मात्र सदर परवानगीचे दरवर्षी नुतनीकरण करून घेणे अपरिहार्य राहील.

६) कराराच्या कालावधीत संस्थेने पुढील प्रत्येक ३ महिन्याच्या कालावधीचे शुक्ल पहिल्या महिन्याच्या १० तारखेपर्यत अग्रीम स्वरूपात महानगरपालिकेकडे जमा करावे. विहित शुल्क जमा केल्यानंतरच प्रशिक्षणार्थीना पाठविण्यात यावे.

७) प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण कालावधीमध्ये रूग्णसेवेवर तसेच रूग्णालयाच्या प्रशासनावर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता सदर संस्थेने घ्यावी.

८) प्रशिक्षण काळात संबंधीत संस्थेचे प्रशिक्षणार्थी रूग्णालयाच्या बाहेर फिरतांना किंवा बाहेर गेल्यास टयुटरला जबाबदार धरण्यात येईल व प्रशिक्षण थांबण्यिात येईल.

९) प्रत्येक विद्यार्थ्यास अनुभवासाठी प्रतिदिन दोन खाटा उपलब्ध करून दिल्या जातील.

तरी त्यांचे विनंती अर्जानुसार शासन निर्णयाप्रमाणे ANM प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी प्रति विद्यार्थी / प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- या प्रमाणे वरील बाबींचा विचार होवुन त्या संस्थेकडून शुल्क आकारणी करून मान्यता देण्यास हरकत नाही. आदेशार्थ सादर. **/अ**

**सोबत-** शासन निर्णय जोडला आहे.

येणे प्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

मुख्य वैद्यकीय अधिकारी :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर दि.२४/१२/०९

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत **"अ"** मान्यतेसाठी दि.२९/१२/०९

मुख्य लेखा अधिकारी :- प्रस्तावीत शुल्क आकारणी करणे योग्य. दि.३०/१२/०९

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार प्रस्तावीत बाबत तुर्त मार्च अखेर पर्यत कार्यवाही करणे योग्य. तथापि शुल्क वाढीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर अर्थसंकल्प सन २०१०-२०११ मध्ये रितसर लेखा विभागा द्वारे आरोग्य विभागाने सादर करावा. दि. ३०/१२/०९/ **अ**

मा.आयुक्त साहेब :- **"अ"** मान्य दि.०४/०१/२०१०

मुख्य लेखा अधिकारी :- मा.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी नगरसचिव विभागास वाढविणे योग्य. दि.१८/१/२०१० **/अ**

मा.आयुक्त साहेब :- मान्य दि. १९/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय:-(३)**अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुती,बाहयरूग्ण विभाग इत्यादी विभागातील कामाचा अनुभव मिळण्यासाठी व प्रशिक्षणासाठी प्रयत्न फौन्डेशन यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन/प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थासाठी प्रति दिन दोन खाटासाठी रूपये २०/- प्रमाणे शुल्क आकारून अटी शर्तीवर परवानगी देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे कामाचा अनुभव मिळण्यासाठी प्रशिक्षणासाठी येणा-या विद्यार्थ्याप्रमाणे फी वसुल करून प्रयत्न फौन्डेशन यांना परवानगी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.बोरगे ए.ए.:- कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्यातील व नगरशहरातील नर्सिंग इन्स्टिटयुटचे विद्यार्थी कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी येतात अशा संस्थेकडून रूपये ५०००/- शुल्क आकारणी केली जात होती. शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००९ सीआ-१२३/०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन , मुंबई-३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९ अन्वये रूग्णालयीन चिकित्सालयीन सुविधा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापरण्यांस प्रति विद्यार्थी /प्रति दिन / प्रति खाट रूपये १०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थी साठी प्रति दिन दोन खाटासाठी रूपये २०/- प्रमाणे शुल्क आकारणी करून सदर संस्थेस परवानगी देणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- शुल्क आकारणी मध्ये वाढ करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- नर्सिंग कोर्स करणारे गरीब घरातील विद्यार्थी असतात. आपण शुल्क घेतल्यास सदर संस्था विद्यार्थीकडूनच तो शुल्क वसुल करतील. फी वाढ करू नये.

मा.उपायुक्त (कर)डॉ.श्री. जावळे साहेब :- सदर संस्था कडून आपणाकडेस विद्यार्थी प्रशिक्षणासाठी येतात. त्यांचेकडून फी घेणे आवश्यक आहे.

मा.श्री.पवार बा.रे. - ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यात यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यांत यावा.

मा.श्री. कांबळे र.द.:-ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यात यावी. मा.महासभे कडेस प्रस्ताव अखेर मंजूरीसाठी सादर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यास शिफारस करण्यांत यावी. अखेर मंजूरीसाठी मा. महासभे कडेस प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुती,बाहयरूग्ण विभाग इत्यादी विभागातील कामाचा अनुभव मिळण्यासाठी व प्रशिक्षणासाठी प्रयत्न फौन्डेशन यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन/प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रति दिन दोन खाटासाठी रूपये २०/-(रूपये वीस फक्त) प्रमाणे शुल्क आकारून अटी शर्तीवर परवानगी देणेस मंजूरी देण्यास शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/४ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक- १०६/४ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(४)** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा. दे. दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्हयातील व शहरातील नर्सिंग इन्स्टिटयुटचे विद्यार्थ्यी कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी /प्रति दिन/ प्रति खाट रूपये १०/-प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रति दिन दोन खाटासाठी रू.२०/- प्रमाणे संस्थाकडून शुल्क आकारणी करून परवानगी देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह, मनपा अ.नगर जा.क्र. ८८५ दिनांक १८/०१/१०

सादर,विषय :- अहमदनगर जिल्ह्यातील वेगवेगळया नर्सिंग इन्स्टिटयूटमधील प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून शुल्क आकारण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००९ सीआ-१२३/०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील नर्सिंग इन्स्टिटयूटचे विद्यार्थी व विद्यार्थीनी कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी दरवर्षी येत असतात.त्यांच्या कडून नगरपालिका असताना मा.स्थायी समितीचा ठराव करून खालीलप्रमाणे वार्षिक शुल्काची आकारणी केली जात होती.

| अ.क्र. | नर्सिंग इन्स्टिटयूटचे नाव | मा. स्था.स.ठ. नं./ दिनांक | घेण्यात येणारे शुल्क रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | पार्वतीबाई म्हस्के इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, अहमदनगर | १३ दि.५/०४/१९९९ | १०००/- |
| २ | स्कुल ऑफ नर्सिंग इव्हॅनजेलीन बुथ हॉस्पीटल , अहमदनगर | ६० दि. ३/१२/१९९९ | १०००/- |
| ३ | मराठा मिशन स्कुल ऑफ नर्सिंग, वडाळा, जि. अहमदनगर | ६९ दि.२२/०१/२००३ | ३०००/- |

तसेच महानगरपालिका झाल्यानंतर मा. आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने खालील इन्स्टिटयूट कडून वार्षिक रू.५०००/- शुल्का आकारणी केली जात होती.

| अ.क्र. | नर्सिंग इन्स्टिटयूटचे नाव | मा.आयुक्तसाहेब यांचा मंजुरीचा दिनांक | घेण्यात येणारे शुल्क रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | डॉ. अनभुले मेडीकल रूरल डेव्हलपमेंट ॲण्ड सोशन फौंडेशन, अहमदनगर | २०/०५/२००४ | ५०००/- |
| २ | श्री. विवेकानंद इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, श्री. शिवाजी नगर (राहुरी फॅक्टरी) ता. राहुरी जि. अहमदनगर | २८/०३/२००६ | ५०००/- |
| ३ | पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, अहमदनगर | १५/०३/२००७ | ५०००/- |
| ४ | आचार्य आनंदऋषीजी इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, अहमदनगर | २०/०३/२००७ | ५०००/- |

परंतु शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००९ सीआ-१२३/०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रायल, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९ अन्वये रूग्णालयीन चिकित्सालयीन सुविधा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापरण्यास प्रती विद्यार्थी / प्रती दिन / प्रति खाटेसाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या आहेत./**अ**

| अ.क्र. | अभ्यासक्रम नांव | शुल्क |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रम | रूपये २५/- |
| २ | भौतिकोपचार, व्यवसायोपचार यासारखे निमवैद्यकीय अभ्यासक्रम | रूपये १५/- |
| ३ | परिचार्या विषयक पदवी / पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम | रूपये १०/- |

तरी शासन निर्णयानुसार संबंधीत नर्सिंग इन्स्टिटयूट मधील ए.एन.एम. व आर.जी.एन.एम. च्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून दरवर्षी नवीन शुल्क घेणे योग्य राहील. प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी वरील प्रमाणे शुल्क म.न.पा. फंडात जमा करून खालील बाबींचा विचार करून प्रशिक्षणासाठी कै.बा.दे. दवाखान्यात सोयी उपलब्ध करून देणे उचित वाटते**./अ**

१) कै.बा.दे. दवाखाना येथे प्रामुख्याने प्रसुती होतात. येथे १०० खाटांची सोय असुन दरमहा अंदाजे सरासरी ३०० पर्यत बाळंतपणे होतात. त्यासाठी प्रशिक्षणार्थीना गट करून पाठविणे आवश्यक आहे.

२) प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकाची (टयुटर) व्यवस्था संबंधीत संस्थेने केली पाहिजे. प्रशिक्षणार्थीवर नियंत्रण ठेवणे ही टयुटरची जबाबदारी राहील. टयुटरने प्रत्येक प्रशिक्षणाच्या वेळी हजर असणे आवश्यक आहे.

३) प्रशिक्षण कालावधीत त्यांचे डयुटी संबंधी इन्चार्ज स्त्री वैद्यकीय अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या संमतीने व सुचनेप्रमाणे संबंधीत संस्थेस व्यवस्था करावी लागेल.

४) प्रशिक्षणासाठी परवानगी दिल्यानंतर प्रत्यक्षात प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी विहित नमुन्यात करारपत्र सदर संस्थेच्या वतीने जबाबदार पदाधिका-यांनी स्वाक्षंकित करून द्यावे लागेल. तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक ती मान्यता इंडियन नर्सिंग कौंसिलच्या सक्षम अधिका-याकडून घेणाची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

५) सदरची परवानगी तात्पुरत्या स्वरूपाची असुन जास्तीत जास्त ५ वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येईल. मात्र सदर परवानगीचे दरवर्षी नुतनीकरण करून घेणे अपरिहार्य राहील.

६) कराराच्या कालावधीत संस्थेने पुढील प्रत्येक ३ महिन्याच्या कालावधीचे शुक्ल पहिल्या महिन्याच्या १० तारखेपर्यत अग्रीम स्वरूपात महानगरपालिकेकडे जमा करावे. विहित शुल्क जमा केल्यानंतरच प्रशिक्षणार्थीना पाठविण्यात यावे.

७) प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण कालावधीमध्ये रूग्णसेवेवर तसेच रूग्णालयाच्या प्रशासनावर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता सदर संस्थेने घ्यावी.

८) प्रशिक्षण काळात संबंधीत संस्थेचे प्रशिक्षणार्थी रूग्णालयाच्या बाहेर फिरतांना किंवा बाहेर गेल्यास टयुटरला जबाबदार धरण्यात येईल व प्रशिक्षण थांबण्यिात येईल.

९) प्रत्येक विद्यार्थ्यास अनुभवासाठी प्रतिदिन दोन खाटा उपलब्ध करून दिल्या जातील.

तरी त्यांचे विनंती अर्जानुसार शासन निर्णयाप्रमाणे ANM प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी प्रति विद्यार्थी / प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- प्रमाणे वरील बाबींचा विचार होवुन वरील सर्व संस्थेकडून शुल्क आकारणी करणेस मान्यता मिळावी ही विनंती आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

वैद्यकीय अधिकारी :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर दि.२४/१२/०९

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत **"अ"** नुसार प्रशिक्षणार्थी साठी शुल्क वसुल करून म.न.पा. फंडात जमा करणेस हरकत नाही. दि.२९/१२/०९

मुख्य लेखा अधिकारी :- प्रस्तावीत शुल्क आकारणी करणे योग्य. दि.३०/१२/०९ **/अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- आदेशार्थ सादर दि.३०/१२/०९ **/अ**

मा.आयुक्त साहेब :- प्रस्तावीत मान्य दि.१८/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-(४)** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा. दे. दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्हयातील व शहरातील नर्सिंग इन्स्टिटयुटचे विद्यार्थ्यी कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी /प्रति दिन/ प्रति खाट रूपये १०/-प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रति दिन दोन खाटासाठी रू.२०/- प्रमाणे संस्थाकडून शुल्क आकारणी करून परवानगी देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह प्रसुती बाहयरूग्ण विभाग इत्यादी विभागातील कामाचा अनुभव मिळण्यासाठी येणा-या विद्यार्थ्याप्रमाणे शुल्क आकारणी करून नर्सिंग इन्स्टिटयुट ना परवानगी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री.जावळे साहेब :-विषय क्रमांक ३ व ४ सारखाच प्रस्ताव आहे अगोदरचा एक संस्थेसाठी होता हा सर्व संस्था साठीचा आहे. मा.सभेने प्रस्तावास मंजूरी द्यावी.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-ऑफिस रिपोर्टास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.प्रस्ताव मा.महासभेकडेस अखेर मंजूरीसाठी सादर करण्यात यावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी. प्रस्ताव मा.महासभे कडेस अखेर मंजूरीसाठी सादर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांस शिफारस करण्यांत यावी.अखेर मंजूरी साठी मा. महासभे कडेस प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्हयातील व शहरातील नर्सिंग इन्स्टिटयुटचे विद्यार्थी कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी /प्रति दिन/प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रति दिन दोन खाटासाठी रूपये २०/-(रूपये वीस फक्त) प्रमाणे संस्थाकडून शुल्क आकारून त्यांना अटी शर्तीवर परवानगी देणेस मंजूरी देण्यास शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/५ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक- १०६/५ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(५)**अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथे पुरविल्या जाणा-या आरोग्य विषयक वैद्यकिय सेवा सुविधाचे सेवा शुल्कात दर वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर म.न.पा. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह जा.नं. ९३६ दि.३/२/२०१०

सादर,

विषय- अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथील दरवाढी बाबत.

उपरोक्त विषयानुसार विनंती पुर्वक रिपोर्ट करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्वसामान्य, गरीब व गरजू रूग्णांना आरोग्य विषयक सेवा व सुविधा म.न.पा.च्या कै.बा.दे. रूग्णालय व सुतिका गृह व इतर दवाखान्यांमार्फत पुरविली जाते. तसेच ज्या भागांमध्ये महानगरपालिकेची वैद्यकीय सेवा व सुविधेचा फायदा मिळत नाही अशा ठिकाणी फिरता दवाखान्यामार्फत सुविधा पुरविण्यात येत आहे. तसेच खालील प्रमाणे वेगवेगळया भागात म.न.पा.चे दवाखाना कार्यरत आहेत.

१) नवीपेठ दवाखाना :- या दवाखान्यामध्ये एक्स-रे, चिकित्सा व निदान करण्यासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा व डोळयांची तपासणी केली जाते.

२) तोफखाना दवाखाना :- या दवाखानामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. व शासनाचे प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम तसेच कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन सेवा देण्यात येतात.

३) झेंडी गेट दवाखाना :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. लसीकरण केले जाते.

४) जुणा दाणेडबरा दवाखाना :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. क्षयरोग केंद्र

५) जिजामाता दवाखाना :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात.

६) म.फुले दवाखाना :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. आर.सी.एच.चे विविध कार्यक्रम राबविले जातात.

७) केडगांव आरोग्य केंद्र :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. आर.सी.एच.चे विविध कार्यक्रम राबविले जातात.

८) मुकुंदनगर आरोग्य केंद्र :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. आर.सी.एच.चे विविध कार्यक्रम राबविले जातात.

९) नागापुर आरोग्य केंद्र :- या दवाखान्यामध्ये बाह्यरूग्ण सेवेअंतर्गत रूग्ण तपासणी व औषधोपचार केले जातात. आर.सी.एच.चे विविध कार्यक्रम राबविले जातात.

१०) फिरता दवाखाना :- ज्या भागांमध्ये महानगरपालिकेची वैद्यकिय सेवा व सुविधेचा फायदा मिळत नाही अशा ठिकाणी फिरता दवाखान्यामार्फत सुविधा पुरविण्यात येते.

तथापि बरेच कालावधी पासून वैद्यकीय अधिकारी काही दवाखान्यामध्ये नसल्याने रूग्णांची संख्या कमी झालेली आढळते परंतु सध्या सर्वच दवाखान्यामध्ये वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून दिल्याने वरील प्रत्येक दवाखान्यामध्ये वार्षिक सरासरी १००० ते १२०० रूग्ण वैद्यकिय सेवा सुविधांचा फायदा घेतील.

तसेच वरील दवाखान्यांव्यतिरिक्त महानगरपालिकेच्या वतीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रूग्णालय याठिकाणी अत्यंत माफक व वाजवी दरात प्रसुती, स्त्री रोग चिकित्सा, नवजात बालकांची तपासणी, कुटूंब नियोजन शस्त्रकिया तसेच तातडीच्या शस्त्रक्रिया केल्या जातात.कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे वार्षिक सरासरी अंतररूग्ण विभागात ६०००रूग्ण व बाह्यरूग्ण विभागात ९५००रूग्ण वैद्यकिय सेवेचा फायदा घेतात. तसेच नुकतेच सन२००६ पासून कै.बा.दे.दवाखाना येथे सोनोग्राफी तपासणी केंद्र सुरू करण्यात आलेले आहे.

वरील बाबत कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील करण्यात येणा-या तपासण्या व वैद्यकीय सेवा व सुविधांबाबत सोबत जोडलेल्या तक्त्या प्रमाणे शुल्क आकारणी केली जाते. सदरचे दर हे सन २००४-२००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यानंतर अद्यापपर्यत दरवाढ केलेली नाही. तसेच दवाखान्यांचे दर सन २००२ पासून मंजुर करण्यात आले आहेत व त्यांचेही दरामध्ये अद्यापपर्यत वाढ करण्यात आलेली नाही. म.न.पा.च्या रूग्णालय व दवाखान्यातून पुरविण्यात येणा-या औषधे, ड्रेसिंग, इंजेक्शन टोचनी व सुविधा इत्यादीचे सध्या असणारे दर पहाता व औषधे व वैद्यकीय साधनांचे वाढणारे किंमती पहाता सध्याचे दर फारच अत्यल्प व कमी आहेत. तसेच शासनाचे नुकतेच प्रजनन व बाल आरोग्य योजना राबविली जात आहे. व यानंतरच्या काळात सदर योजने अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी वर्गाचे वेतनावरील सर्व खर्च महानगरपालिकेला सोसावा लागणार आहे. माहे नोव्हेबंर २००९ पर्यत झालेला खर्च व पुढील चार महिन्यांच्या आपेक्षित खर्च धरून सध्याला दवाखान्यांवर, रूग्णालयांवर खालील प्रमाणे खर्च होत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | स्थायी आस्थापना | :- १,१४,२४,८३७/- |
| २) | ऑनररी डॉक्टर | :- २,९१,२०९/- |
| ३) | फॅमिली प्लॅनिंग | :- १,०६,१०४/- |
| ४) | औषधे व उपकरणे | :- १५,००,०००/- |
| | एकूण खर्च | :- १,३३,२२,१५०/- |

म.न.पा.च्या दवाखाने व रूग्णालये यांचे पुरविण्यात येणारे वैद्यकीय सेवा व सुविधा पासून माहे नोव्हेंबर २००९ पर्यत मिळालेले उत्पन्न व पुढील चार महिन्यांचे आपेक्षित उत्पन्न मिळून सन २००९-१० मधील सरासरी उत्पन्न १६,००,०००/- इतके आहे.

वरील प्रमाणे जमा व खर्चाचे ताळमेळ पहाता रू.१,१७,२२,१५०/- इतकी मोठयाप्रमाणात तफावत असल्याने सोबतच्या तक्त्याप्रमाणे दरामध्ये वाढ केल्यास त्या पासून अंदाजे रू.३५,००,०००/- इतके वाढीव उत्पन्न महानगरपालिकेस आपेक्षित आहे व काही प्रमाणात असणारी तफावत कमी होवु शकेल.

तसेच सध्या रक्तपेढी विभागात रक्तदान केल्यास अथवा रक्तदानाचे सवलत पत्र असल्यास रू.२५०/- व सवलत पत्र नसल्यास रू.४००/- याप्रमाणे सेवा शुल्क आकारून रक्त पिशवी वितरीत केली जाते. तसेच भविष्यात रक्त घटक सुविधा निर्माण झाल्यास P.C.V. Platetets, F.F.P. हे रक्त घटक वितरीत करण्यासाठी रक्तदानाचे सवलत पत्र असल्यास रू.२५०/- व सवलत पत्र नसल्यास रू.४००/- याप्रमाणे रक्त पिशवीचे दर सन २००९-१० च्या बजेटमध्ये मंजुर करण्यात आलेले आहेत.

सदरचे दर हे सन २००३-२००४ पासून लागु आहेत. गेल्या ६ ते ७ वर्षात कोणतीही दरवाढ करण्यात आलेली नाही. रक्तपेढी आस्थापना खर्च रू.३०,७०,०००/- व औषध खर्च अंदाजे रू.१८ ते २० लाख याप्रमाणे रक्तपेढीसाठी अंदाजे ५०,००,०००/- खर्चाची तरतूद आहे.तसेच रक्तघटक निर्मिती सेवेसाठी अंदाजे रू. ६५ लाख खर्च आपेक्षित आहे. इतर रक्तपेढयांच्या तुलनेतत सध्याचे दर अत्यल्प आहेत. तरी यापासून दरवर्षी अंदाजे रू. १० ते १५ लाख इतके उत्पन्न रक्तपेढीस मिळते.

वरील जमाखर्चाचा ताळमेळ पहाता उत्पन्न व खर्च या मधील तफावत कमी करणेसाठी सुधारीत दर Whole Blood व रक्त घटकांसाठी प्रत्येक रक्तपिशवीस रक्तदान केल्यास अथवा रक्तदानाचे सवलत पत्र असल्यास रू.३५०/- व सवलत पत्र नसल्यास रू.५००/- याप्रमाणे उचित वाटते. जेणे करून दरवर्षी रू.५,००,०००/- इतके उत्पन्न वाढेल अशी आपेक्षा आहे.

तरी वरीलप्रमाणे दवाखने, रूग्णालय व रक्तपेढीचा दरवाढीचा प्रस्ताव मंजुरीस व आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

वैद्यकीय अधिकारी :- दर कर वाढीबाबत निर्णय घेणेस मा.स्थायी समितीपुढे ठेवणे उचित वाटते. दि. ३/०२/१०

मुख्य लेखा अधिकारी :- कर / दर वाढीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी ठेवणे योग्य आदेशार्थ सादर.

दि.०४/०२/१० **/अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार मान्यतेस्तव सादर. दि.०४/०२/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.०४/०२/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**नवीपेठ दवाखाना चिकित्सा व निदान केंद्र व क्ष-किरण विभाग येथे घेण्यात येणा-या सेवा शुल्काचा (दराचा ) तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | सेवाशुल्काचा तपशील (फिल्मसह) | सध्याचे दर | प्रस्तावीत सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | क्ष-किरण फोटो काढण्यासाठी<br>८"x१०" साईज | ५५/- | ११०/- |
| | १०" x१२" | ७५/- | १५०/- |
| | १२" x१५" | ८५/- | १७०/- |
| २ | **प्रयोगशाळा तपासणी फी** | | |
| | फुल ब्लड काउन्ट | १५/- | ३०/- |
| | इ.एस.आर. | १०/- | २०/- |
| | स्टुल | १०/- | २०/- |
| | युरिन | १०/- | २०/- |
| | स्पुटम | १५/- | ३०/- |
| | सिमेन | २०/- | ४०/- |
| | जी.सी.स्मिअर | - | - |
| | विडाल टेस्ट | २५/- | ५०/- |
| | ग्रॅम स्टेन | -- | -- |
| | ब्लिडींग क्लॉटींग टाईम | १५/- | ३०/- |
| | ब्लड शुगर | २५/- | ५०/- |
| | ब्लड युरिया | २५/- | ५०/- |
| | व्ही.डी. आर.एल. | २०/- | ४०/- |
| | ब्लड ग्रुपिंग | २५/- | ५०/- |
| | प्रेग्नंसी टेस्ट | ४०/- | ८०/- |
| | हिमोग्लोबीन टेस्ट | ०५/- | १०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | युरीन शुगर | ०५/- | १०/- |
| | युरीन बॉईल्ड सॉल्ट | ०५/- | १०/- |
| | सिरम क्रियाटीनीन | -- | -- |
| | बिलीरूबिन | -- | -- |
| | अल्कालईन फॉस्फेट | -- | -- |
| | केसपेपर फी (७ दिवसाकरिता ) | ०१/ | १०/- |
| | सिरम बिलीरूबीन | २५/- | ५०/- |
| | एस.जी.पी.टी. | ३०/- | ६०/- |
| | अल्कलाईन फॉस्फोटेस्ट | ४०/- | ८०/- |
| | सिरम कोलेस्ट्रॉल | ३०/- | ६०/- |
| | सिरम क्रियाटीनीन | ३०/- | ६०/- |
| | आर.ए. टेस्ट | ४०/- | ८०/- |
| | **वैद्यकीय प्रमाणपत्र** | | |
| | १५ दिवसा करिता | २५/- | ५०/- |
| | ३० दिवसा करिता | ४०/- | ८०/- |
| | **मानद सेवी तज्ञ डॉक्टरांकडून तपासणीकरिता केसपेपर फी** | ०५/- | १०/- |

**महानगरपालिकेच्या छोटया दवाखांन्यामध्ये खालीलप्रमाणे वैद्यकीय सेवा बाबत शुल्क दर घेण्यात येत आहेत. पुढील प्रमाणे दर वाढविणे आवश्यक आहे.**

| **अ.क्र.** | **वैद्यकीय सेवा तपशील** | **सध्याचे दर** | **प्रस्तावीत सुधारीत दर** |
|---|---|---|---|
| १ | नवीन केसपेपर ७ दिवसा करिता | १/- | १०/- |
| २ | औषधे १ दिवसा करिता | ३/- | १०/- |
| ३ | ड्रेसिंग करिता | २/- | १०/- |
| ४ | धनुर्वात लस व इतर लसीकरण | मोफत | मोफत |
| | **वैद्यकीय प्रमाणपत्र** | | |
| | १५ दिवसा करिता | २५/- | ५०/- |
| | ३० दिवसा करिता | ४०/- | ८०/- |
| | नोकरी करीता फिटनेस | ५०/- | १००/- |

## रक्तेपढी विभागामधील घेण्यात येणा-या शुल्का व वाढीव दराचा तपशील

| अ.क्र. | तपशील | सध्याचे दर | | प्रस्तावीत सुधारीत दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | सवलत पत्र असल्यास | सवलत पत्र नसल्यास | सवलत पत्र असल्यास | सवलत पत्र नसल्यास |
| १ | Whole Blood | २५०/- | ४००/- | ३५०/- | ५००/- |
| २ | P.C.V. | २५०/- | ४००/- | ३५०/- | ५००/- |
| ३ | Platelets | २५०/- | ४००/- | ३५०/- | ५००/- |
| ४ | F.F.P. | २५०/- | ४००/- | ३५०/- | ५००/- |

**कै. बाळासाहेब देशपांडे रूग्णालयात घेण्यात येणारे सेवा शुल्क दराबाबत तपशील**

**बाह्यरूग्ण विभाग**

| अ.नं. | तपशील | करीता रूपये | दुरूस्ती रूपये |
|---|---|---|---|
| १ | नवीन केस पेपर काढण्याकरीता पहिल्या दिवशी (अॅन्टीनेटल एक्झामिनेशन ) | १०/- | २०/- |
| २ | जुने केस पेपर काढण्या करीता प्रत्येक दिवशी | २/- | ५/- |
| ३ | नवीन केसपेपर काढण्याकरीता (पी.व्ही.एक्झामिनेशन करीता ) | ५/- | १०/- |
| ४ | ड्रेसिंग | ५/- | १०/- |
| ५ | कॉटरायझेशन | ३५/- | ७०/- |
| ६ | युरीन | १०/- | २०/- |
| ७ | एच.बी. | १०/- | २०/- |
| ८ | व्ही.डी.आर.एल. | २०/- | ४०/- |
| ९ | आर.एच.ब्लड ग्रुप | २५/- | ५०/- |
| १० | बी.टी.सी.टी | १०/- | २०/- |
| ११ | सोनोग्राफी तपासणी फी | ५०/- | १००/- |

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना**

**(नवीन सुधारीत दर १/०४/२००४ पासून)**

**अंतररूग्ण विभाग (नर्सिंग होम)**

| अ.नं. | तपशील | करीता रूपये | दुरूस्ती रूपये |
|---|---|---|---|
| १ | प्रतिदिन जनरल वॉर्ड | १५/- | ३०/- |
| २ | प्रतिदिन निमखाजगी वॉर्ड | ६०/- | १२०/- |
| ३ | प्रतिदिन खाजगी वॉर्ड | १५०/- | ३००/- |
| | **बाळंतपण** | | |
| १ | पहिले नॉर्मल | १००/- | २००/- |
| २ | दुसरे नॉर्मल | १५०/- | ३००/- |
| ३ | तिसरे व त्यापुढील प्रत्येक नॉर्मल | ३००/- | ६००/- |
| | **ऑपरेशन** | | |
| १ | सिझेरियन पहिले | ४००/- | ८००/- |
| | रिझेरियन दुसरे व त्यापुढील | ५००/- | १०००/- |
| २ | व्हर्शन | ३००/- | ६००/- |
| ३ | फॉरसेप्स | ७५/- | १५०/- |
| ४ | प्लॉशिंग | ७५/- | १५०/- |
| ५ | हिस्ट्रेक्टोमी | ३५०/- | ७००/- |
| ६ | भुल (टी अल्बशिवाय ) | १००/- | २००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | क्रिनियाटोमी | ३५०/- | ७००/- |
| ८ | ऑसटॉयटींग | ७५/- | १५०/- |
| ९ | बायप्सी | ७५/- | १५०/- |
| १० | लॅप्रोटोमी व संबधीत तातडीचे पोटाचे ऑप. | ३५०/- | ७००/- |
| ११ | कॅथेटरायझेशन | १५/- | ३०/- |
| १२ | सलाईन | २५/- | ५०/- |
| १३ | लॉकल ॲनेस्थेशिया | ३०/- | ६०/- |
| १४ | लंबर पंक्चर | ३०/- | ६०/- |
| १५ | सिंपल एनिमा | ०५/- | १०/- |
| १६ | डी ॲण्ड सी (Evacution) | ७५/- | १५०/- |
| १७ | नियोनेटल युनिट सेवा | २५/- | ५०/- |
| १८ | एम.टी.पी. | २००/- | ४००/- |
| १९ | आय.एम.पी.सी.प्रती | ०२/- | ०४/- |
| २० | आय.व्ही.पी.सी. प्रत | ०३/- | ०६/- |
| २१ | एस.ई. व ड्रेसिंग प्रती | ०५/- | १०/- |
| २२ | हर्निया | २५०/- | ५००/- |
| २३ | एम.आर.पी. | ३०/- | ६०/- |
| २४ | पोलीपेक्टोमी | २००/- | ४००/- |
| २५ | इंजे. ॲट्रोपीन | ०३/- | ०६/- |
| २६ | इंजे. पेंझील | ०६/- | १२/- |
| २७ | इंजे. फिनारगन | ०८/- | १६/- |
| २८ | इंजे. फोरट्वीन | ०६/- | १२/- |
| २९ | इंजे. एंझोल | ०६/- | १२/- |
| ३० | इंजे. एम्पीसिलिन | ०७/- | १४/- |
| ३१ | इंजे. टेट्नस् (टी.टी.) | ०३/- | ०६/- |
| ३२ | इंजे. ड्रोटीन | ०८/- | १६/- |
| ३३ | इंजे. झायलोकीन | ०३/- | ०६/- |
| ३४ | इंजे. मेथयजीन | ०६/- | १२/- |
| ३५ | इंजे. झेंटामायसीन | ०६/- | १२/- |
| ३६ | आय.व्ही. ड्रेक्सट्डोस सलाईन | १४/- | २८/- |
| ३७ | आय.व्ही. रींगर लॅक्टेट | १७/- | ३४/- |
| ३८ | आय.व्ही.डेक्सट्रोज ५% | १४/- | २८/- |
| ३९ | टॅब. एव्हील २५mg x १०० Tab | २४५/- | ४९०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | **रजेकरीता सर्टिफिकेट** | | |
| १ | फक्त बाळंतपणाकरीता व इतर कारवायाकरीता १५ दिवसांसाठी | २५/- | ५०/- |
| २ | एक महिन्याकरीता | ४०/- | ८०/- |
| ३ | दोन महिन्याकरीता | ५०/- | १००/- |
| ४ | नोकरी करीता फिटनेस | ५०/- | १००/- |
| | **टाके** | | |
| १ | जनरल वॉर्ड | १०/- | २०/- |
| २ | प्रायव्हेट वॉर्ड | ३०/- | ६०/- |

मागासवर्गीयांसाठी सेवा- शासनाने मंजुर केलेल्या यादी प्रमाणे मागासवर्गीयांना फक्त एक आपत्यापर्यत सेवा मोफत परंतु स्पेशल रूम घेतल्यास रूमच भाडे, रक्त, लघवी, तपासणी, औषधे, भुल, इंजे, ऑपरेशन इत्यादीची फी घेणे व दुस-या आपत्यास नियमित फी आकारली जाईल.

| | | | |
|---|---|---|---|
| | आर.ए.टेस्ट | ४०/- | ८०/- |
| | **वैद्यकीय प्रमाणपत्र** | | |
| | १५ दिवसा करीता | २५/- | ५०/- |
| | ३० दिवसा करीता | ४०/- | ८०/- |
| | मानद सेवी तज्ञ डॉक्टरांकडून तपासणीकरिता केसपेपर फी | ०५/- | १०/- |

महानगरपालिकेच्या दवाखांन्यामध्ये खालीलप्रमाणे वैद्यकीय सेवा बाबत शुल्क दर घेण्यात येत आहेत. पुढील प्रमाणे दर वाढविणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | वैद्यकीय सेवा तपशील | सध्याचे दर | प्रस्तावीत सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | नवीन केसपेपर ७ दिवसा करिता | १/- | १०/- |
| २ | औषधे १ दिवसा करिता | ३/- | १०/- |
| ३ | ड्रेसिंग करिता | २/- | १०/- |
| ४ | धनुर्वात लस व इतर लसीकरण | मोफत | मोफत |

येणे प्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :- (५)**अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथे पुरविल्या जाणा-या आरोग्य विषयक वैद्यकिय सेवा सुविधाचे सेवा शुल्कात दर वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

हा विषय सभे मध्ये॑ वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये॑ झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथे पुरविल्या जाणा-या सेवा सुविधाचे शुल्कात दर वाढ करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविणेचे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य आहे. गरीब नागरिक महानगरपालिकेचे दवाखान्याचा लाभ घेतात शुल्कामध्ये वाढ करू नये.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- वाढ करू नये.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- आरोग्य विषयक सेवा सुविधाचे शुल्कामध्ये दर वाढ केल्यास महानगरपालिकेचे किती उत्पन्न वाढणार आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.बोरगे ए.ए.:- महानगरपालिका दवाखान्यावर रूग्णालयावर रूपये १,३३,२२,१५०/- इतका खर्च करते तर उत्पन्न रूपये १६ लाख मिळते दर वाढ केल्यास वाढी व उत्पन्न रूपये ३५ लाख इतके अपेक्षित आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- दर वाढ करू नये.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री. बोरगे ए.ए. :- महानगरपालिकामार्फत पुरविल्या जाणा-या सर्वच आरोग्य सेवा करितांचे सध्याचे फी सन २००४-२००५ पासून आकारली जाते. सन २००४-२००५ पासून फी मध्ये वाढ केलेली नाही.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब / मा.उपायुक्त (सा.) श्री.हांगे साहेब:- आपला खर्च जास्त असुन उत्पन्न कमी येते दर वाढ केली नाही तर नागरिकांना सर्व काही फ्री दिल्या सारखे होते मा.सभेने शिफारस करून मा. महासभेकडेस प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा. महासभेकडेस सादर करणेत यावा.

मा.श्री. पवार द.ज.:- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी. अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा. महासभेकडेस सादर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.अखेर मंजूरीसाठी मा.महासभेकडेस प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथे पुरविल्या जाणा-या आरोग्य विषयक वैद्यकिय सेवा सुविधाचे सेवा शुल्कात दर वाढ करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/६ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक- १०६/६ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(६)** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ अंतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना २००९ अन्वये अग्निशमन सेवा फी बसविणे आणि फी मध्यें वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभाग जा.क्र. दिनांक ०४/०२/२०१०

सादर-विषय :- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना २००९ अन्वये अग्निशमन सेवा फी बसविणे आणि फी मध्ये वाढ करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मुख्य अग्निशमन अधिकारी यांजकडुन विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम २५ (१) नुसार आग सुरक्षा निधी निर्माण करणे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणाला बंधनकारक आहे. या अधिनियमानुसार बांधकामा संदर्भात सर्व संबंधितांना अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र देतांना उक्त अधिनियमाच्या अनुसुची (१) नुसार आग सुरक्षा निधी आकारणे बंधनकारक आहे.

उपरोक्त अधिनियमाच्या प्रकरण चार मधील अग्निशमन सेवा फी आकारणी , गोळा करणे या संबंधीच्या तरतुदी कलम ११ ते १७ अन्वये ठरवुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये इमारतीच्या भोगवटयाचा प्रकार व लोकसंख्येच्या निकषान्वये ३ लाखांपेक्षा अधिक परंतु ५ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या नसलेली महानगरपालिका यांना अग्निशमन फी आकारणेबाबतचे दर प्रस्तावित केलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या वाढीमुळे महाराष्ट्र शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार महानगरपालिकामधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेसाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" राबविणे बाबत तसेच अग्निशमन केंद्रासाठी जागा आरक्षितकरणे त्याचप्रमाणे सदरच्या वाढीमध्ये जमा होणा-या निधीचा विनियोज"आग सुरक्षा निधी" या लेखाशिर्षकाखाली जमा होउत्न अग्निशमन सेवेतील तुट भरणेकामी व अत्याधुनिक साधन सामुग्री तसेच उपकरणे खरेदी व काही प्रमाणात अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर खर्च भागविण्यासाठी वापरण्यात येईल. त्यामुळे मा.शासनाने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र आग सुरक्षा अभियानामध्ये सहभागी होउत्न अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण व बळकटीकरण करणेस सहाय्यभुत ठरेल.

यापुर्वी अग्निशमन दलातर्फे विविध ट्रेडधारकांना ना हरकत प्रमाणपत्र देतांना अग्निशमन दलातर्फे व्यापारी संकुले ज्यांची उंची १५ मीटरपेक्षा कमी आहे तसेच एकुण बांधकामक्षेत्रफळ १५० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त आहे अशा इमारतींसाठी कॅपिटेशन फी (फायर फंड) रक्कम रु.२/- प्रति चौ.मी. किंवा कमीत कमी रक्कम रु. १०,०००/- इतकी आकारणी केली जात आहे.

सदर अधिनियमातील कलम ११ (३) नुसार प्राधिकरणास मा.शासनाने निर्धारित केलेल्या दरामध्ये या प्रकारच्या अन्य तरतुदींना अधिन राहुन वेळोवेळी वार्षिक फी सह फी चा दर वाढविता येईल आणि अशा वाढविलेल्या दराने फी आकारता येईल असे नमुद केलेले आहे.

तरी सदर अधिनियमातील प्रस्तावित दरामध्ये सन २०१०-२०११या आर्थिक वर्षापासुन खालीलप्रमाणे वाढ करणे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे होईल व अंदाजे रक्कम रु.२५,००,०००/- उत्पन्न महानगरपालिकेस मिळु शकेल. तरी सदरचा रिपोर्ट मंजुरीस्तव सविनय सादर.

| **अ.नं.** | **तपशिल** | **जुना दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|
| १ | व्यापारी संकुले ज्यांची उंची १५ मीटरपेक्षा कमी आहे तसेच एकुण बांधकाम क्षेत्रफळ १५० चौ.मी.व त्यापेक्षा जास्त आहे. अशा इमारतींसाठी<br><br>(अ) कॅपिटेशन फी (फायर फंड)<br><br>(ब) ना हरकत प्रमाणपत्र<br>(क) नुतनिकरण | (व्यापारी संकुले यात स्पेशल बिल्डींग लाईफ असेम्बली इन्स्टिटयुशनल स्टोअरेज ॲण्ड मिक्स ॲक्युपन्सीज) रु. २/- प्रति चौ.मी. किंवा कमीत कमी रु.<br>१०,०००/-<br>५००/-<br>३००/- | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत मा.शासनाने प्रस्तावित केलेल्या दरात फी वाढ करणेबाबतचे प्रस्तावित दर खालीलप्रमाणे.<br>(अनुसुची-२) |

**अनुसुची - दोन**

कलम ३ (१) स्पष्टीकरण व कलम ११ (१) पहा

**भाग- १**

महानगरपालिकांकरीता अग्निशमन सेवा फी ची रचना

| **अ.नं.** | **इमारतीच्या भोगवटयाचा प्रकार** | **(सदर अधिनियमातील दर) ३ लाखापेक्षा अधिक परंतु ५ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या नसलेली म.न.पा.** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | | **४** | |
| | | फी प्रति चौरसमीटर रूपये | किमान...... रूपयांच्या अधीन | फी प्रति चौरसमीटर रूपये | किमान...... रूपयांच्या अधीन |
| **१ निवासी इमारती (क)** | | | | | |
| क | लॉजिंग किंवा भाडयाने देता येतील अशी घरे (क-१) | | | | |
| | १५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) १५ खोल्यापर्यंत | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) १५ पेक्षा अधिक व ३० खोल्यापर्यंत | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| | (तीन) ३० खोल्यांपेक्षा अधिक | ५.०० | २०,०००.०० | ६.०० | २५,०००.०० |
| **ख वेश्मिका (क-४)** | | | | | |
| (१) | १५ ते २४ मीटर उंचीच्या | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| (२) | २४ मीटर व त्यावरील परंतु ३५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| (३) | ३५ मीटरपेक्षा अधिक परंतु ४५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या | अनुमती नाही. | | अनुमती नाही. | |
| (४) | ४५ मीटरपेक्षा अधिक उंचाच्या | अनुमती नाही. | | अनुमती नाही. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **ग हॉटेल (क-५)** | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) प्रत्येक मजल्यावर ३०० चौरस मीटरपेक्षा अधिक नाही इतके क्षेत्र व्यापलेल्या. | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) प्रत्येक मजल्यावर ३०० चौरस मीटरपेक्षा अधिक परंतु १००० चौरस मीटरपेक्षा अधिक नाही इतके क्षेत्र व्यापलेल्या. | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| | (तीन) प्रत्येक मजल्यावर १००० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या. | ५.०० | २५,०००.०० | ६.०० | ३०,०००.०० |
| (२) | १५ मीटर आणि त्यावरील परंतु ३० मीटरपेक्षा अधिक नसलेल्या. | ७.०० | ३५,०००.०० | ८.०० | ४०,०००.०० |
| (३) | ३० मीटर वरील उंचीच्या | अनुमती नाही. | | अनुमती नाही. | |
| **(घ) हॉटेल (तारांकित ) (क - ६)** | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) त्रितारांकित हॉटेल | ८.०० | ४०,०००.०० | १०.०० | ५०,०००.०० |
| | (दोन) पंचतारांकित हॉटेल | १०.०० | ५०,०००.०० | १२.०० | ७५,०००.०० |
| | (तीन) सप्ततारांकित हॉटेल | १२.०० | ७५,०००.०० | १५.०० | १,००,०००.०० |
| (२) | १५ मीटर व त्यावरील परंतु ३० मीटरपेक्षा अधिक उंची नसलेल्या. | १५.०० | १,००,०००.०० | २०.०० | १,५०,०००.०० |
| (३) | ३० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या | अनुमती नाही. | | अनुमती नाही. | |
| **शैक्षणिक इमारती (ख)** | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) तळ मजला अधिक एक मजल्याच्या. | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) तळ मजला अधिक दोन मजल्याच्या. | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| (२) | १५ मीटर व त्यावरील परंतु ३० मीटरपेक्षा अधिक नाही इतक्या उंचीच्या | ५.०० | २५,०००.०० | ६.०० | ३,०००.०० |
| | संस्थेच्या इमारती (ग) | | | | |
| **(क) रूग्णालये, आरोग्यधाम व शुश्रुषागृहे (ग-१)** | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या (एक) १००० चौरस मीटरपेक्षा कमी भुखंड क्षेत्राच्या, तळमजला अधिक एक मजला असलेल्या व खाटा नसलेल्या. | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) १००० चौरस मीटरपेक्षा कमी भुखंड क्षेत्राच्या, तळमजला अधिक एक मजला असले-या व खाटा असलेल्या. | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (तीन) दोन मजल्यांपेक्षा अधिक मजले असलेल्या व खाटा नसलेल्या. | ४.०० | २०,०००.०० | ५.०० | २५,०००.०० |
| | (चार) दोन मजल्यांपेक्षा अधिक मजले असलेल्या व खाटा असलेल्या. | ५.०० | २५,०००.०० | ६.०० | ३०,०००.०० |
| (२) | १५ मीटर व त्यावरील उंचीच्या,परंतु २४ मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ६.०० | ३०,०००.०० | ७.०० | ३५,०००.०० |
| (३) | २४ मीटरपेक्षा अधिक आणि उंचीच्या. | अनुमती नाही | | अनुमती नाही | |
| **(ख) अभिरक्षार्थ (ग-२) व शिक्षार्थ व प्लेन्टल (ग - ३)** | | | | | |
| (१) | १० मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) ३०० व्यक्तीपर्यत | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन ) ३०० व्यक्तीपेक्षा अधिक | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| (२) | १० मीटर व त्यावरील उंचीच्या,परंतु १५मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ४.०० | २०,०००.०० | ५.०० | २५,०००.०० |
| (३) | १५ मीटर व त्यावरील परंतु २४ मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ५.०० | २५,०००.०० | ६.०० | ३०,०००.०० |
| (४) | २४ मीटर व त्यावरील परंतु ३० मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | अनुमती नाही | | अनुमती नाही | |
| **समाजमंदिरे (घ)** | | | | | |
| (१) | १० मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) ३०० व्यक्तीपर्यत | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन ) ३०० व्यक्तीपेक्षा अधिक | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| (२) | १० मीटर व त्यावरील परंतु १५मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ४.०० | २०,०००.०० | ५.०० | २५,०००.०० |
| (३) | १५ मीटर परंतु २४ मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ५.०० | २५,०००.०० | ६.०० | ३०,०००.०० |
| (४) | २४ मीटरवरील परंतु ३० मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | अनुमती नाही | | अनुमती नाही | |
| **व्यावसायिक इमारती (ड)** | | | | | |
| (१) | १० मीटरपेक्षा कमी उंचीच्या | १.०० | १०,०००.०० | २.०० | २०,०००.०० |
| (२) | १० मीटरवरील परंतु १५मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ३.०० | २५,०००.०० | ४.०० | ३०,०००.०० |
| (३) | १५मीटरवरील व २४ मीटरपर्यत उंचीच्या | ४.०० | ३०,०००.०० | ५.०० | ३५,०००.०० |
| (३) | २४ मीटरवरील उंचीच्या | अनुमती नाही | | अनुमती नाही | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **वाणिज्यिक इमारती (च)** | | | | | |
| **च - १ व च - २** | | | | | |
| (१) | १० मीटरपेक्षा कमी उंचीच्या | | | | |
| | (एक) तळ मजला अधिक एक मजल्याच्या, ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक नाही इतके क्षेत्र व्यापलेल्या. | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) तळ मजला अधिक एक मजल्याच्या, ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या. | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| | (तीन) तळ मजला अधिक एक मजला यापेक्षा अधिक मजल्यांच्या. | ४.०० | २०,०००.०० | ५.०० | २५,०००.०० |
| (२) | १५ मीटरवरील परंतु २४ मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | ५.०० | २५,०००.०० | ७.०० | ३५,०००.०० |
| (३) | २४ मीटरवरील परंतु ३० मीटरपेक्षा अधिक नाही अशा उंचीच्या. | अनुमती नाही | | अनुमती नाही | |
| **(ख) भुयारी व्यापारी संकुल (च-३) औद्योगिक इमारती (छ)** | | | | | |
| **(क) कमी धोक्याच्या (छ - १)** | | | | | |
| | १८ मीटर उंचीपर्यतच्या | | | | |
| | (एक)५०चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) ५० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि १०० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ३.०० | १५,०००.०० | ४.०० | २०,०००.०० |
| | (तीन) १०० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि २०० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ४.०० | २०,०००.०० | ५.०० | २५,०००.०० |
| | (चार) २०० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि ४०० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ५.०० | २५,०००.०० | ७.०० | ३५,०००.०० |
| | (पाच) ४०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या. | ७.०० | ३५,०००.०० | १०.०० | ५०,०००.०० |
| **(ख) मध्यम धोक्याच्या (छ-२)** | | | | | |
| | १८ मीटर उंचीपर्यतच्या | | | | |
| | (एक) १०० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | १.०० | १०,०००.०० | २.०० | १५,०००.०० |
| | (दोन) १०० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि २५० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ३.०० | २०,०००.०० | ४.०० | २५,०००.०० |
| | (तीन) २५० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि ५०० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ४.०० | २५,०००.०० | ५.०० | ३५,०००.०० |
| | (चार) ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या. | ५.०० | ३५,०००.०० | ७.०० | ५०,०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(ग) अति धोक्याच्या (छ - ३)** | | | | | |
| | (क) १५ मीटर उंचीपर्यतच्या | | | | |
| | (एक) ५० चौरस मीटरपेक्षा एवढे क्षेत्र व्यापलेल्या. | १.०० | १५,०००.०० | २.०० | २०,०००.०० |
| | (दोन) ५० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि १५० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ३.०० | २०,०००.०० | ४.०० | २५,०००.०० |
| | (तीन) १५० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि ३००चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ४.०० | ३०,०००.०० | ५.०० | ३५,०००.०० |
| | (चार) ३०० चौरस मीटरपेक्षा अधिक आणि ५०० चौरस मीटरपर्यत क्षेत्र व्यापलेल्या. | ५.०० | ३५,०००.०० | ७.०० | ४०,०००.०० |
| | (पाच) ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या. | ७.०० | ५०,०००.०० | १०.०० | ७५,०००.०० |
| (ख) | धोकादायक वायू व पेट्रोलियम पदार्थ वाहून नेणारे क्षेत्रपार (Cross Country) नळ मार्ग. | ७.०० प्रति मिटर | ५०,०००.०० | १०.०० प्रति मिटर | ७५,०००.०० |
| **गोदामे (ज)** | | | | | |
| (१) | १५ मीटर उंचीपर्यतची | | | | |
| | (एक) एक मजली इमारत | ३.०० | १०,०००.०० | ५.०० | १५,०००.०० |
| | (दोन) तळ मजला अधिक एक मजला | ५.०० | १५,०००.०० | ७.०० | २०,०००.०० |
| (२) | तळ मजला अधिक एकाहून अधिक मजले. | ७.०० | २०,०००.०० | १०.०० | २५,०००.०० |
| **धोकादायक इमारती (झ)** | | | | | |
| (१) | १५ मीटर उंचीपर्यतच्या | | | | |
| | (एक) एक मजली इमारत | ५.०० | १५,०००.०० | ७.०० | २०,०००.०० |
| | (दोन) एक मजल्यापेक्षा अधिक मजल्यांची इमारत पंरतु १५ मीटरपेक्षा अधिक उंच नाी अशा इमारत | ७.०० | २०,०००.०० | १०.०० | २५,०००.०० |
| | | | | या पैकी जी रक्कम जास्त असेल ती आकारणेत येईल. | |

येणे प्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी, यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक :- उपरोक्त रकाना क्र.४ मध्ये अग्निशामक फी दर वाढ स्थायी समितीकडे मान्यतेसाठी सादर. दि.४/०२/१०

मुख्य लेखा अधिकारी :- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अधिनियम २००६ अंतर्गत अग्निशमन सेवा फी आकारणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव सादर करणे योग्य दि.०४/०२/१० / **अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** प्रस्तावीतनुसार मान्यतेस्तव सादर. दि.०४/०२/१०

मा.आयुक्त साहेब :- जकात बंद होणार असल्याने अर्थसंकल्प तयार करतांना उत्पन्न व खर्चाचा मेळ घालण्याचे दृष्टीने व शासनाच्या आदेशानुसार दर लावणे आवश्यक. दि.०४/०२/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :- (६)** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ अंतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना २००९ अन्वये अग्निशमन सेवा फी बसविणे आणि फी मध्यें वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपायोजना अधिनियम २००६ अंतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अन्वये अग्निशमन फी बसविणे आणि फी मध्ये वाढ करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- अधिनियम २००६ मधील आहे. त्यानुसार सदर प्रकरणी पूर्वीच कार्यवाही केलेली नाही अजेंडया सोबतचे प्रस्तावाबरोबर मा. शासनाचे परिपत्रक जोडलेले नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा. शासनाने सन २००९ मध्ये परिपत्रक काढलेले आहे. त्यानुसार प्रस्ताव सभेपुढे मंजूरीसाठी सादर केलेला आहे. अजेंडया बरोबर मा.शासनाचे परिपत्रक देणेची प्रथा नसलेने मा. सदस्यांना परिपत्रकाच्या प्रती दिलेल्या नाहीत प्रस्ताव मा.सभेने प्रस्तावास मंजूरी द्यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी. अखेर मंजूरीसाठी मा.महासभे कडेस प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

मा.श्री.कांबळे र.द. :-ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा.महासभे कडेस सादर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी. अखेर मंजूरीसाठी मा.महासभे कडेस प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ अंतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना २००९ अन्वये अग्निशमन सेवा फी बसविणे आणि फी मध्यें वाढ करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

विषय क्रमांक- १०६/७ सोमवार दिनांक १५/०२/२०१०

ठराव क्रमांक - १०६/७ सोमवार दिनाक १५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार नवीन कर दर लावणे बाबतचे प्रस्ताव.**

**(७)**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६,१(अ) व ३८६(१) अन्वये शहरातील व्यापारी संकुल, हॉटेल्स, इमारती, सिनेमागृह, पेट्रोलपंप, हॉस्पीटल, लॉजेस इत्यादी साठी अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर महानगरपालिका अग्निशमन विभाग जा.क्र. ४८७ दि. ०४/०२/२०१०
सादर-विषय :- अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन दल ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मुख्य अग्निशमन अधिकारी यांजकडुन विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेकडुन अग्निशमन सेवा पुरविली जाते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ (अ) व ३८६ (१) नुसार शहरातील व्यापारी संकुल, तारांकीत हॉटेल्स व उंच इमारती यांना कॅपिटेशन फी लागु करणे व अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे तसेच सिनेमागृह , हॉटेल्स, इमारती, रॉकेलसाठा, पेट्रोलपंप, हॉस्पिटल्स, लॉज इ. साठी ना हरकत प्रमाणपत्र घेणे व नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त प्रमाणे ट्रेडधारकांना अग्निशमन दलातर्फे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षामध्ये निश्चित केलेल्या दराप्रमाणे फी आकारणी करुन ना हरकत प्रमाणपत्र, हद्दीबाहेर आग विझविणेबाबतचे शुल्क तसेच स्टॅण्डबाय डयुटी चार्जेस आकारणी करुन अग्निशमन दलातर्फे सेवा पुरविली जाते. सदरच्या निश्चित केलेल्या दरामध्ये आजतागायत कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नसुन अग्निशमन सेवा आणखी प्रभावीपणे सक्षम व बळकटीकरण करणे गरजेचे असल्याने आगामी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासुन सदरच्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होउत्न आर्थिक हिताचे होईल.

सबब सदर दरामध्ये वाढ केल्याने वर्षाला अंदाजे रक्कम रु. ४,००,०००/- (अक्षरी रु. चार लक्ष मात्र) उत्पन्न महानगरपालिकेस मिळु शकेल. तरी सदरचा रिपोर्ट मंजुरीस्तव सविनय सादर.

| अ.नं. | तपशिल | जुना दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक व प्रशिक्षण | रु. २०००/- + साहित्य (हद्दीमध्ये विनामुल्य) | रु.४०००/- + साहित्य (हद्दीबाहेर) |
| २ | पंपिंग कॉल चार्जेस | रु. ३०० + इंधन | रु. ५००/- + इंधन |
| ३ | आग विझविणेबाबतचे प्रमाणपत्र | रु. १५०/- | रु. ५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | अग्निशमन साहित्य तपासणे व प्रमाणित करणे | रु. १००/- | रु. ५००/- |
| ५ | स्टॅण्डबाय डयुटी चार्जेस (प्रतिदिन/ प्रतिटेंडर) | रु. १०००/- | रु. २०००/- + प्रति रु. १०/- कि.मी. चार्जेस |
| ६ | नविन प्रस्तावितासाठी<br>(अ) ना हरकत प्रमाणपत्र<br>(ब) नुतनिकरण | <br>रु. १०००/-<br>रु. ५००/- | <br>रु.२०००/-<br>रु. १०००/- |
| ७ | तारांकीत हॉटेलसाठी<br>(अ) ना हरकत प्रमाणपत्र<br>(ब) नुतनिकरण | <br>रु. १५००/-<br>रु. १०००/- | <br>रु.३०००/-<br>रु. २०००/- |
| ८ | हायराईज बिल्डींग (१५/२४ मिटर)<br>(अ) ना हरकत प्रमाणपत्र<br>(ब) नुतनिकरण | <br>रु. १०००/-<br>रु. ५००/- | <br>रु.२०००/-<br>रु.१०००/- |
| ९ | फायर कॉल चार्जेस (म.न.पा.हद्दीबाहेर) | रु. ४/- प्रति कि.मी. + लेबर चार्जेस व इतर खर्च | रु.१०/- प्रति कि.मी.+ घसारा + लेबर चार्जेस व इतर खर्च |
| १० | व्यापारी संकुले ज्यांची उंची १५ मीटरपेक्षा कमी आहे तसेच एकुण बांधकाम क्षेत्रफळ १५० चौ.मी.व त्यापेक्षा जास्त आहे. अशा इमारतींसाठी<br><br>(अ) कॅपिटेशन फी (फायर फंड)<br><br>(ब) ना हरकत प्रमाणपत्र<br>(क) नुतनिकरण | (व्यापारी संकुले यात स्पेशल बिल्डींग लाईफ असेम्बली इन्स्टिटयुशनल स्टोअरेज ॲण्ड मिक्स ॲक्युपन्सीज)<br>रु. २/- प्रति चौ.मी. किंवा कमीत कमी रु.<br>१०,०००/-<br>५००/-<br>३००/- | (व्यापारी संकुले यात स्पेशल बिल्डींग लाईफ असेम्बली इन्स्टिटयुशनल स्टोअरेज ॲण्ड मिक्स ॲक्युपन्सीज)<br>रु. ४/- प्रति चौ.मी. किंवा कमीत कमी रु.<br>यापैकी जी रक्कम २०,०००/-<br>जास्त असेल ती १०००/-<br>आकारणेत येईल ५००/- |

येणे प्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी, यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक :- रकाना क्र.४ मध्ये अग्निशामक दल ना हरकत प्रमाणपत्र फी वाढ मंजूरीसाठी स्थायी समिती कडे सादर. दि.०४/०२/१०

मुख्य लेखा अधिकारी :- ना हरकत प्रमाणपत्र फी वाढीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव सादर करणे योग्य आदेशार्थ. दि.०४/०२/१० / **अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** प्रस्तावीतनुसार मान्यतेस्तव सादर. दि.०४/०२/१०

मा.आयुक्त साहेब :- जकात बंद होणार असल्याने अर्थसंकल्पतील उत्पन्न व खर्च याचा मेळ घालण्याचे दृष्टीने दरवाढ होणे आवश्यक दि.०४/०२/२०१०.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहरामधील व्यापारी संकुले, हॉटेल्स, इमारती, सिनेमागृह, पेट्रोलपंप, हॉस्पीटल, लॉजेस इत्यादी साठी अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेचे प्रस्तावास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- कमर्शिअल हॉटेल, हॉस्पीटल इत्यादी इमारती साठी अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेचे प्रस्तावास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव मा. सभेपुढे सादर करण्यांत आलेला आहे. त्यास मा. सभेने मंजूरी द्यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- कर वाढ करणे आवश्यक आहे का?

मा.उपायुक्त (कर)डॉ.श्री. जावळे साहेब :- अग्निशमन विभागाकरिता अत्याधुनिक साहित्य खरेदी इत्यादी साठी कर वाढ करणे आवश्यक आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- प्रस्ताव कायदयानुसार मा.सभे पुढे सादर केलेला आहे. तो मा. सभेने मंजूर नाही केला तर आम्ही सदर ठराव रद्द करून मा. शासनाकडेस मंजूरीसाठी पाठविणेची कारवाई केली जाईल.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- आपले महानगरपालिकेमध्ये फायरमन चे पद आहे का?

मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. मिसाळ एस.यु. :- आपले फायरमनची पदे भरलेली नाहीत.

मा.श्री.लोंढे शि.बा.:- आपले महानगरपालिकेमध्ये फायरमन चे पद भरलेले नाही. फायरमन नसलेने एखादे नागरिकाने महानगरपालिकावर फायर ब्रीगेड मुळे काही नुकसान झाले त्याचे भरपाई साठी दावा केल्यास आपण काय करणार फायरमन चे काम आपले कडेस बिगारीच करतात.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- अग्निशमन विभागाकडेस बिगारी आहेत. त्यांना फायरमन चे कोर्ससाठी पाठविण्यात यावे स्टॅपिंग पॅटर्न मध्ये फायरमनचा प्रस्ताव आहे. मा. महासभेने त्यास मंजूरी दिले नंतर पद भरणे बाबत कार्यवाही करणेत येईल.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- केडगांव भागासाठी फायर ब्रिगेड स्थापन करणेस मंजूरी मिळलेली आहे. परंतु कार्यवाही झालेली नाही.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- प्रस्ताव मा. महासभे कडेस मंजूरीसाठी सादर केलेला आहे. मंजूरी नंतर आवश्यक ती कार्यवाही करणेत येईल.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा. महासभे कडेस सादर करणेत यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांस शिफारस करण्यात यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा. महासभे कडेस सादर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देण्यास शिफारस करण्यात यावी.अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा. महासभे कडेस सादर करणेत यावा.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६,१(अ) व ३८६(१) अन्वये शहरातील व्यापारी संकुल, हॉटेल्स, इमारती, सिनेमागृह, पेट्रोलपंप, हॉस्पीटल, लॉजेस इत्यादी साठी अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेचे प्रस्तावास मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.